## वापरासाठी असलेल्या अटी

*Disclaimer: In the event of any discrepancy or conflict in the translated version, the English version will prevail over the translation.*

"www.paisabazaar.com" ही वेबसाईट आणि त्यांचे मोबाईल ॲप्लिकेशन (एकत्रितपणे "वेबसाइट" म्हणून संबोधले जावे) यावरील प्रवेश आणि वापर यासाठी लागू होणाऱ्या अटी आणि शर्ती हा करार निर्धारित करतो. ही वेबसाइट, भारतीय कायद्याअंतर्गत विधी-संस्थापित असलेल्या आणि कंपनी कायदा, 1956 अंतर्गत नोंदणीकृत केलेल्या पैसाबझार मार्केटिंग अँड कन्सल्टिंग प्रायव्हेट लिमिटेड (यापुढे एकत्रितपणे "कंपनी"/"पैसाबझार" म्हणून संबोधले जाईल) यांचेकडून व्यवस्थापित आणि संचालित केली जाते.

हा दस्तावेज/करार ("करार" म्हणून संबोधले आहे) माहिती तंत्रज्ञान कायदा, 2000 च्या संदर्भात एक इलेक्ट्रॉनिक रेकॉर्ड असून संगणक प्रणालीद्वारे तयार करण्यात आला आहे, ज्यावर कुठल्याही भौतिक अथवा डिजिटल स्वाक्षरींची आवश्यकता नाही. हा दस्तावेज, माहिती तंत्रज्ञान (मध्यवर्ती मार्गदर्शक तत्त्वे), 2011 च्या नियम 3 अन्वये असलेल्या तरतुदींनुसार प्रकाशित केला आहे, जो या वेबसाइटवरील प्रवेश किंवा वापर याकरिता आवश्यक असलेली उचित सावधानता घेण्याची तरतूद करतो.

या वेबसाइटवर प्रवेश करून किंवा तुमची माहिती वेबसाइटवर रजिस्टर करून वापरकर्ते (येथून पुढे "तुम्ही" किंवा "तुमचे" असे संबोधले आहे) या वापरासाठी असलेल्या अटींना ("TOU") बांधील असल्याचे मान्य करतात. गोपनियता धोरण आणि अस्वीकृती यांचेसहितचा हा करार तुमच्याशी असलेले आमचे नाते वर्णन करतो, जे या वेबसाइटद्वारे दिलेल्या कुठल्याही विशिष्ट सेवेला लागू होणारे नियम, मार्गदर्शक तत्त्वे, धोरणे, अटी आणि शर्ती यांच्या अधीन असेल, ज्या या वापरण्यासंबंधी असलेल्या अटींमध्ये समाविष्ट केल्या आहेत असे मानले जाईल आणि त्यांना या TOU चा अविभाज्य भाग समजले जाईल.

TOU च्या सध्या प्रचलित असलेल्या आवृत्तीचे वेळोवेळी पुनरावलोकन करण्यासाठी या पृष्ठावर परत येण्याचे सुनिश्चित करा. आम्ही कुठल्याही वेळी, आमच्या एकमात्र विवेकाधिकारात, कुठल्याही पूर्वसूचनेशिवाय TOU मध्ये बदल करण्याचा किंवा अन्यथा सुधारित करण्याचा अधिकार राखून ठेवतो आणि तुम्ही या वेबसाईटवर सतत केलेला प्रवेश किंवा वापर हा या अद्ययावत किंवा सुधारित केलेल्या TOU ला असलेली तुमची स्वीकृती दर्शवतो.

कृपया या अटी आणि शर्ती काळजीपूर्वक वाचा. येथे समाविष्ट असलेल्या अटींना तुम्ही दिलेली स्वीकृती, येथे खाली परिभाषित केलेल्या उद्देशाकरिता तुम्ही आणि कंपनी यांच्यामधील करार स्थापित करते.

### 1. सेवांचे वर्णन आणि स्वीकृती

-

कंपनी याद्वारे तुम्हाला मुख्यतः कर्ज सुविधा, क्रेडिट कार्ड सुविधा तसेच बचत खाते, मुदत ठेवी आणि म्युच्युअल फंड यांसारख्या गुंतवणूक सुविधांची (एकत्रितपणे "सेवा"/"सेवा" असे संबोधले आहे), पण यापुरत्याच मर्यादित नसलेल्या, काही वित्तीय प्रॉडक्ट्सची/सेवांची माहिती देऊ करते. कर्ज, क्रेडिट कार्ड सुविधा, म्युच्युअल फंडशी संबंधित गुंतवणूक सेवांसह बचत खाते, मुदत ठेवी या सुविधा पैसाबझार देते. याशिवाय, कंपनी क्रेडिट तपासणी सेवांसहित

पण यापुरत्याच मर्यादित नसलेल्या तृतीय पक्ष सेवा आणि तुम्ही निवड केलेल्या सेवांसोबतच (सहाय्यक सेवा) तुमची माहिती तृतीय पक्षाच्या साइटद्वारे (उदा. बँकेची साइट इ.) पुनर्प्राप्त करण्यासाठी आणि वापरण्यासाठी इतर कुठल्याही सेवा प्रदान करू शकते. उपरोक्त सेवा आणि सहाय्यक सेवा या व्यावसायिकरित्या उचितप्रकारे केलेल्या प्रयत्नांच्या आधारे दिल्या जातात आणि वर नमूद केलेल्या सेवांचा लाभ घेण्यासाठी तुमचा सहभाग हा पूर्णपणे तुमच्या इच्छेनुसार आणि संमतीने आहे, यास तुम्ही सहमती देता.

या सेवांचा आणि सहाय्यक सेवांचा तुम्ही वेळोवेळी केलेला निरंतर वापर देखील अद्ययावत केलेल्या TOU किंवा त्यामधील कुठल्याही सुधारणेसोबतच TOU ला असलेली तुमची स्वीकृती दर्शवितो आणि जोपर्यंत हा करार संपुष्टात येत नाही तोपर्यंत तुम्ही या करारास येथे परिभाषित केलेल्या तरतुदींनुसार बांधील आहात.

मार्केटिंगच्या संयुक्त उद्देशांकरिता/विविध सेवा देण्याकरिता/रीपोर्ट तयार करण्याकरिता आणि/किंवा यासारख्या सेवांकरिता तसेच तुम्ही निवड केलेल्या किंवा अन्यथा सेवांबरोबरच विविध मूल्यवर्धित सेवा तुम्हाला देण्याकरिता, आवश्यकता असल्यास तुमची माहिती इतर समूह कंपन्यांना आणि तृतीय पक्षांना देण्यासाठी तुम्ही सहमती देता आणि कंपनीला अधिकार देता. तुम्ही कंपनी किंवा तिचे तृतीय पक्ष व्हेंडर/व्यवसाय भागीदार/संलग्नित मार्केटिंग कंपन्या यांच्याकडून सेवा/सहाय्यक सेवांची अद्ययावत माहिती, माहिती/जाहीरातसंबंधी ईमेल्स आणि/किंवा प्रॉडक्टसंबंधीच्या घोषणांबाबत ईमेल, टेलीफोन आणि/किंवा एसएमएसद्वारे सूचना प्राप्त करण्यास सहमती देता. या संदर्भात, तुम्ही दिलेल्या मोबाईल क्रमांकावर, जरी हा मोबाईल क्रमांक TRAI नियमनांतर्गत DND/NCPR सूचीमध्ये रजिस्टर केलेला असला तरी, सर्व सूचना प्राप्त करण्यासाठी तुम्ही सहमती आणि संमती देता. आणि त्या उद्देशाकरिता तुम्ही पुढे कंपनीला कुठलाही तृतीय पक्ष सेवा प्रदाता किंवा कुठलीही संलग्नित कंपनी, तिच्या समूह कंपन्या, अधिकृत एजंट्स यांना माहिती देण्याचे/माहिती उघड करण्याचे अधिकार देता.

आमच्या कायदेशीर उत्तरदायित्वांचे पालन करण्यासाठी, विवादांचे निराकरण करण्यासाठी आणि सेवा व सहाय्यक सेवा देण्याकरिता आम्ही केलेल्या करारांची अंमलबजावणी करण्यासाठी कंपनी तुमची माहिती स्वतःजवळ राखून ठेवेल आणि तिचा वापर करेल.

## 2. परवाना आणि वेबसाईटवर प्रवेश

-

सेवांमध्ये समाविष्ट असलेल्या कुठल्याही बौद्धिक संपदा अधिकारांसह (ते अधिकार रजिस्टर केलेले असले किंवा नसले तरीही) सर्व कायदेशीर अधिकार, शीर्षक आणि सेवेमधील आणि सेवेसंबंधी असलेला अधिकार कंपनीकडे आहे, हे तुम्ही मान्य करता आणि त्यास सहमती देता. याशिवाय तुम्ही असे मान्य करता की सेवांमध्ये अशी माहिती असू शकते जी कंपनीने गोपनीय म्हणून निर्दिष्ट केली आहे आणि कंपनीच्या पूर्व लेखी संमतीशिवाय अशी माहिती तुम्ही उघड करणार नाही. वेबसाइटचे दृश्यरुप व कार्यप्रणाली ("लुक आणि फील") (उदा. सामग्री, ग्राफिक्स, प्रतिमा, लोगो आणि बटन आयकॉन), छायाचित्रे, संपादकीय सामग्री, सूचना, सॉफ्टवेअर आणि इतर सामग्री यांचा समावेश असलेले वेबसाइटवरील घटक, कंपनी आणि/किंवा तिचे तृतीय पक्ष सेवा प्रदाते/त्यांचे परवानाधारक यांच्या मालकीचे/परवानाकृत आहेत आणि लागू असलेले कॉपीराइट, ट्रेडमार्क आणि इतर कायद्यांतर्गत त्यांचेकडून योग्यप्रकारे संरक्षित केले आहेत.

कंपनी तुम्हाला वेबसाइटवरील प्रवेशाचा, वेबसाइट, सेवा आणि सहाय्यक सेवा यांचा वापर करण्याचा मर्यादित परवाना देते. इतर व्यक्ती, व्हेंडर किंवा इतर कुठल्याही तृतीय पक्षाच्या फायद्याकरिता कुठल्याही प्रकारची माहिती डाउनलोड करणे किंवा कॉपी करणे, किंवा सेवांमध्ये बदल करून त्या रीव्हर्स इंजिनिअर, रीव्हर्स असेंबल करून त्यापासून इतर कार्य व्युत्पन्न करणे (डेरिव्हेटिव्ह वर्क), किंवा अन्यथा कुठलाही सोर्स कोड शोधण्याचा, या सेवांची विक्री करण्याचा, सेवांच्या वापराचा अधिकार इतरांना देण्याचा (assign), सेवांचा परवाना तृतीय पक्षांना देण्याचा (sublicense), सेवांमधील सीक्युरिटी इंटरेस्ट प्रदान करण्याचा प्रयत्न करण्याचा किंवा अन्यथा सेवांमधील अधिकार हस्तांतरित करण्याचा अधिकार या परवान्यामध्ये समाविष्ट नाही. तुमच्याकडून कुठलाही अनधिकृत वापर झाल्यास तुम्हाला दिलेली अनुमती किंवा परवाना समाप्त होईल.

वेबसाइटचा वापर करून तुम्ही पुढील गोष्टी न करण्यास सहमती देताः 1) ही वेबसाइट किंवा तिच्या सामग्रीचा कुठल्याही व्यावसायिक उद्देशाकरिता वापर करणे, 2) मागणीच्या अपेक्षेने कुठलाही आर्थिकदृष्ट्या धोक्याचा, खोटा किंवा फसवा व्यवहार किंवा कुठलाही व्यवहार करणे, 3) आमच्या स्पष्ट लेखी संमतीशिवाय कुठलाही रोबो, स्पायडर, स्क्रॅपर किंवा इतर स्वयंचलित साधनांचा वापर करून किंवा कुठल्याही मानवी प्रयत्न असलेल्या प्रक्रियेने कुठल्याही उद्देशाकरिता या वेबसाइटवरील कुठलीही सामग्री किंवा माहिती मिळविणे, निरीक्षण करणे किंवा नक्कल करणे, 4) या वेबसाइटवरील कुठल्याही रोबो एक्सक्लुजन हेडर्समधील निर्बंधांचे उल्लंघन करणे किंवा या वेबसाइटवरील प्रवेश प्रतिबंधित किंवा मर्यादित करण्यासाठी वापरण्यात आलेल्या उपायांना टाळणे किंवा प्रतिबंधित करणे, 5) अशी कुठलीही कृती करणे जी आमच्या विवेकाधिकारानुसार, आमच्या आधारभूत संरचनेवर अवास्तव किंवा असमानतेने मोठा भार लादते किंवा लादू शकते., 6) आमच्या स्पष्ट लेखी परवानगीशिवाय कुठल्याही उद्देशाकरिता या वेबसाइटच्या कुठल्याही भागाशी लिंक जोडणे (यामध्ये मर्यादेशिवाय कुठल्याही सेवेकरिता असलेले प्रक्रियेचे टप्पे समाविष्ट आहेत) किंवा 7) आमच्या पूर्व लेखी अधिकृततेशिवाय या वेबसाइटच्या कुठलाही भागाची फ्रेम, प्रतिकृती (मिरर) बनवणे किंवा अन्यथा इतर कुठल्याही वेबसाइटमध्ये समाविष्ट करणे.

**3. गोपनियता धोरण**

-

आम्ही आमच्या गोपनियता धोरणात नमूद केल्याप्रमाणे, वेबसाइटचा वापर करून तुम्ही तुमची माहिती वापरण्यास संमती देता. जेव्हा तुम्ही वेबसाइटवर प्रवेश करता आणि इतर सहाय्यक सेवा वापरता तेव्हा कंपनी तुमची वैयक्तिक माहिती कशी हाताळते, हे या गोपनियता धोरणात स्पष्ट केले आहे.

**4. तुमचे रजिस्ट्रेशन/अकाउंट**

-

तुम्ही वेबसाइटचा करणार असलेला वापर आणि आमच्याबरोबरचे रजिस्ट्रेशन विचारात घेता, तुम्ही असे दर्शवता की एक बंधनकारक करार तयार करण्यासाठी तुम्ही कायदेशीर वयाचे आहात आणि भारताच्या कायद्यानुसार किंवा इतर लागू अधिकारक्षेत्रांतर्गत सेवा प्राप्त करण्यापासून प्रतिबंधित केलेली व्यक्ती नाही आणि केवळ तुमच्याकरिता किंवा ज्यांच्याकरिता कृती करण्याचा तुम्हाला कायदेशीररित्या अधिकार आहे अशा इतर व्यक्तींकरिता विधीमान्य खरेदी करण्यासाठी (आणि अशा इतर व्यक्तींना TOU आणि/किंवा गोपनियता धोरणाची माहिती द्याल) जे तुम्ही त्यांच्यावतीने केलेल्या खरेदीला लागू होते (त्यासाठी लागू असलेल्या सर्व नियमांसह आणि निर्बंधांसह), तुम्ही वेबसाइटचा वापर कराल.

तुम्ही सहमती देता आणि समजता की तुमच्या पासवर्डची गोपनीयता राखण्यासाठी तुम्ही पूर्णतः जबाबदार आहात, जो तुम्हाला तुमच्या लॉगइन आयडीसह (निवडलेल्या सेवेनुसार लागू असेल) सेवा वापरण्याची परवानगी देतो. तो लॉगइन आयडी आणि पासवर्ड तसेच तुम्ही दिलेला कुठलाही मोबाईल क्रमांक किंवा संपर्काबाबतची इतर माहिती हे सगळे मिळून तुमची रजिस्ट्रेशन माहिती तयार होते. तुम्ही सहमती देता की तुमचा लॉगइन आयडी व पासवर्ड यांची गोपनियता राखण्यासाठी आणि तुमच्या संगणकाचा वापर प्रतिबंधित करण्यासाठी तुम्ही जबाबदार आहात. तुमच्या अकाउंट किंवा पासवर्डद्वारे होणाऱ्या सर्व कार्यांची सर्व जबाबदारी स्वीकारण्यासाठी तुम्ही सहमत आहात. यासाठी आम्ही आग्रहपूर्वक अशी शिफारस करतो की प्रत्येक सेशनच्या शेवटी तुम्ही तुमच्या अकाउंटमधून बाहेर पडा/लॉगआऊट करा. तुम्ही तुमच्या अकाउंटचा अनधिकृत वापर किंवा सुरक्षिततेच्या इतर कुठल्याही उल्लंघनाबाबत कंपनीला ताबडतोब सूचित करण्यास सहमती देता. याशिवाय तुम्ही सहमती देता की कुठल्याही अनधिकृत वापरासाठी किंवा प्रवेशासाठी कंपनी तोपर्यंत जबाबदार राहणार नाही जोपर्यंत हे सिद्ध होत नाही की अनधिकृत वापर किंवा प्रवेश अशा कारणांमुळे झाला आहे ज्यांचा संबंध थेट कंपनीशी आहे.

तुम्ही तुमच्याबद्दलची खरी, अचूक, वर्तमान आणि पूर्ण माहिती द्याल आणि तुमच्या रजिस्ट्रेशन माहितीमध्ये झालेल्या कुठल्याही बदलाची माहिती देण्याची/अद्ययावत करण्याची जबाबदारी घ्याल आणि ती नेहमी अद्ययावत ठेवाल, कारण त्याचा कंपनीकडून किंवा कंपनीद्वारे दिल्या जाणाऱ्या सेवांच्या आणि सहाय्यक सेवांच्या तरतुदींवर थेट परिणाम होतो. तुम्ही सहमती देता की, तुम्ही स्वतःची चुकीची ओळख दाखविणार नाही किंवा तुम्ही वेबसाइटचा अथवा सेवांचा बेकायदेशीररित्या वापर करण्याचा प्रयत्न करणार नाही. तुम्ही निवड केलेल्या सेवांच्या खरेदीसाठी अतिरिक्त अटी आणि शर्ती लागू होतील. कृपया या अतिरिक्त अटी आणि शर्ती काळजीपूर्वक वाचा.

**5. ग्राहकासंदर्भातील उचित सावधानतेच्या आवश्यकता**

-

तुम्ही सहमती आणि स्वीकृती देता की, वेबसाइटद्वारे कुठलेही आर्थिक व्यवहार करण्यासाठी आमची कंपनी क्लाएंट/ग्राहकांच्या संदर्भात उचित सावधानतेची उपाययोजना करू शकते आणि लागू असलेल्या मनी लॉंड्रिंग प्रतिबंध कायद्याच्या ("PMLA") आणि नियमांच्या अन्वये कर्ज/क्रेडिट कार्ड/म्युच्युअल फंड आणि इतर वित्तीय प्रॉडक्ट्सकरिता बँका/वित्तीय संस्था यांचेकडे तुम्ही केलेल्या विनंतीच्या संदर्भात KYC करिता आवश्यक असलेली अनिवार्य माहिती घेऊ शकते, जी एक ग्राहक म्हणून देणे तुम्हाला बंधनकारक आहे. आमची कंपनी तिच्या आणि बँकेच्या/वित्तीय संस्थेच्या समाधानासाठी, प्रत्येक नवीन ग्राहक/वापरकर्त्याची ओळख प्रमाणित करण्यासाठी आणि तुमच्या आणि बँका/वित्तीय संस्था यांच्यामधील संबंधांच्या अपेक्षित स्वरूपाच्या उद्देशाची खात्री करण्यासाठी पुरेशी माहिती मिळवू शकते. तुम्ही सहमती आणि स्वीकृती देता की आमची कंपनी तिच्या स्वतःच्या समाधानाकरिता, लागू असलेल्या PMLA कायदा आणि नियमांतर्गत असलेल्या आवश्यकता आणि बंधने यांच्या अनुषंगाने ग्राहकाच्या संदर्भातील उचित सावधानतेच्या आवश्यकतांसाठी, सुधारित उचित सावधानतेच्या उपाययोजना (कुठल्याही दस्तावेजीकरणासह) करू शकते.

**6. पात्रता**

-

तुम्ही घोषित करता आणि पुष्टि करता की तुम्ही 18 (अठरा) वर्षांवरील वयाचे भारताचे रहिवासी आहात आणि कंपनीने देऊ केलेल्या सेवांचा लाभ घेताना, भारतीय करार कायदा, 1872 अंतर्गत निर्दिष्ट केल्यानुसार तुमची करार करण्याची क्षमता आहे.

**7. सादर केलेली सामग्री**

-

वेबसाइटवर कुठलाही डेटा आणि माहिती असलेल्या कुठल्याही सामग्रीची माहिती देऊन किंवा ती सादर करून तुम्ही सहमती देता की वेबसाइटवर प्रदर्शित केलेल्या सर्व सामग्रीकरिता तुम्ही पूर्णपणे जबाबदार असाल आणि तुम्ही वेबसाइटवर किंवा वेबसाइटद्वारे उपलब्ध करून दिलेल्या कुठल्याही सामग्रीकरिता कंपनी जबाबदार राहणार नाही. तुम्ही सहमती देता की तुम्ही सादर करीत असलेल्या सामग्रीसाठी तुम्ही पूर्णपणे जबाबदार आहात. या वेबसाइटवर किंवा या वेबसाइटवरून पुढील गोष्टींचे प्रकाशन किंवा प्रसारण करण्यास तुम्हाला प्रतिबंधित करण्यात येत आहेः (1) प्रसिद्धी आणि/किंवा गोपनियतेच्या अधिकारांचे उल्लंघन करणारे किंवा कोणत्याही कायद्याचे उल्लंघन करणारे कुठलेही बेकायदेशीर, धमकावणारे, अब्रूनुकसानीकारक, बदनामीकारक, बीभत्स, अश्लील किंवा इतर साहित्य अथवा सामग्री, (2) कुठलेही व्यावसायिक साहित्य किंवा सामग्री (निधीची मागणी, जाहिरात किंवा कुठल्याही वस्तू व सेवांचे मार्केटिंग यांचा समावेश असलेली, पण यापुरतीच मर्यादित नसलेली), आणि (3) कुठलेही साहित्य किंवा सामग्री जी कुठल्याही तृतीय पक्षाचा कुठलाही कॉपीराईट, ट्रेडमार्क, पेटंट अधिकार किंवा इतर मालकी अधिकाराचे उल्लंघन, दुरूपयोग किंवा भंग करते. आधी नमूद केलेल्या निर्बंधांच्या कुठल्याही उल्लंघनामुळे किंवा या वेबसाइटवर तुमची सामग्री प्रदर्शित केल्यामुळे होणाऱ्या कुठल्याही हानीसाठी तुम्ही पूर्णपणे जबाबदार असाल.

**8. तृतीय पक्ष लिंक्स/ऑफर्स**

-

ही वेबसाइट, इतर वेबसाइट किंवा संसाधनांच्या लिंक्स देऊ शकते. अशा तृतीय पक्ष वेबसाइट्स आणि संसाधनांवर कंपनीचे नियंत्रण नसल्याकारणाने तुम्ही स्वीकृती आणि सहमती देता की, अशा बाह्य साइट्स किंवा संसाधनांच्या उपलब्धतेकरिता कंपनी जबाबदार नाही आणि अशा कुठल्याही साइट्स किंवा संसाधनांवर असलेली किंवा त्याद्वारे उपलब्ध होणारी कुठलीही सामग्री, जाहिरात, प्रॉडक्ट्स किंवा इतर सामग्री यांना कंपनी मान्यता देत नाही आणि त्याकरिता जबाबदार अथवा उत्तरदायी नाही. तुम्ही पुढे स्वीकृती आणि सहमती देता की अशा कुठल्याही साइट्सवर किंवा संसाधनांवर अथवा त्याद्वारे उपलब्ध असलेली कुठलीही सामग्री, वस्तू किंवा सेवांच्या वापरामुळे किंवा त्यावर अवलंबून राहिल्यामुळे किंवा कथितपणे झालेल्या कुठल्याही हानीकरिता किंवा नुकसानीकरिता कंपनी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे जबाबदार किंवा उत्तरदायी राहणार नाही. या वेबसाइटच्या माध्यमातून तुम्ही कुठल्याही तृतीय पक्षाशी साधलेल्या संपर्कासंबंधीची जोखीम तुमची स्वतःची आहे आणि अशा कुठल्याही तृतीय पक्षांच्या कृती, चुका, त्रुटी, प्रतिनिधीत्व, हमी, उल्लंघने किंवा निष्काळजीपणा यांचे संदर्भात किंवा तृतीय पक्षांबरोबर साधलेल्या संपर्काच्या परिणामस्वरूप झालेल्या कुठल्याही वैयक्तिक दुखापती, मृत्यू, मालमत्तेचे नुकसान किंवा इतर नुकसान अथवा खर्च याकरिता कंपनीचे कुठल्याही प्रकारचे उत्तरदायित्व राहणार नाही.

**9. ग्रुप इन्शुरन्स पॉलिसी**

-

तुम्ही हे समजता की कंपनीकडून दिल्या जाणाऱ्या सेवांचा एक भाग म्हणून, कंपनी तुम्हाला पुढे निरनिराळ्या विमाकर्त्यांचे ग्रुप इन्शुरन्स संरक्षण ऑफर करू शकते, ज्याकरिता मास्टर पॉलिसी होल्डर ("MPH") पैसाबझार मार्केटिंग अँड कन्सल्टिंग प्रायव्हेट लिमिटेड हे राहतील, याकरिता तुम्ही कंपनीचे ग्राहक असणे आवश्यक आहे. अशा प्रकारचे विमा संरक्षण हे भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण ("IRDAI") यांचेकडून शासित केले जाईल आणि त्यांनी जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार अटी, शर्ती, आणि त्यांचे अपवाद, मर्यादा यांचे अधीन असेल.

**10. हमीची अस्वीकृती**

-

तुम्ही स्पष्टपणे समजता आणि सहमती देता की, वेबसाइटवर समाविष्ट केलेल्या किंवा वेबसाइटच्या माध्यमातून उपलब्ध होण्यायोग्य सेवा, सहाय्यक सेवा आणि सर्व माहिती, प्रॉडक्ट्स, इतर सेवा आणि इतर सामग्री (तृतीय पक्षांच्या सामग्रीसहित) यांचा तुमच्याकडून जो वापर होईल त्याची जोखीम ही तुमच्या एकट्याची आहे. सेवा आणि सहाय्यक सेवा "जशा आहेत" आणि "जशा उपलब्ध आहेत" तत्त्वावर दिल्या जातात. वेबसाइटवरील सामग्रीची किंवा सेवांची (तृतीय पक्ष सेवा प्रदात्यांद्वारे प्रायोजित असो किंवा नसो) अचूकता, विश्वासार्हता किंवा परिपूर्णता या संदर्भात कंपनी कुठलेही व्यक्त किंवा अव्यक्त प्रतिनिधित्व करत नाही, हमी किंवा लेखी आश्वासन देत नाही आणि एखाद्या विशिष्ट हेतूकरिता उल्लंघन न होण्याची किंवा योग्यतेची कुठलीही हमी स्पष्टपणे नाकारते.

सेवांमध्ये समाविष्ट केलेल्या किंवा सेवांद्वारे उपलब्ध होण्यायोग्य सेवा, सहाय्यक सेवा आणि सर्व माहिती, प्रॉडक्ट्स, सेवा आणि इतर सामग्री (तृतीय पक्षांच्या सामग्रीसहित), व्यक्त असो किंवा अव्यक्त, तसेच व्यापारक्षमतेच्या, एखाद्या विशिष्ट हेतूकरिता योग्यतेच्या आणि उल्लंघन न होण्याच्या अव्यक्त हमींसहित पण यापुरत्याच मर्यादित नसलेल्या कुठल्याही प्रकारच्या सर्व हमी कंपनी स्पष्टपणे नाकारते.

कंपनी आणि तिचे सेवा प्रदाते, संलग्नित कंपन्या, व्यवसायातील भागीदार याची कुठलीही हमी देत नाहीत की - (1) सेवा तुमच्या आवश्यकता पूर्ण करतील, (2) सेवा विनाव्यत्यय, वेळेवर मिळणाऱ्या, सुरक्षित किंवा त्रुटीरहित असतील, (3) सेवांचा वापर केल्यावर त्यातून प्राप्त होणारे परिणाम अचूक किंवा विश्वासार्ह असतील, (4) सेवांद्वारे तुम्ही खरेदी केलेल्या किंवा प्राप्त केलेल्या कुठल्याही प्रॉडक्टची, सेवांची, माहितीची किंवा इतर सामग्रीची गुणवत्ता तुमच्या अपेक्षा पूर्ण करेल आणि (5) तंत्रज्ञानातील कुठल्याही त्रुटी दुरूस्त केल्या जातील.
प्रॉडक्ट्सच्या किंमती आमच्या वेबसाइटवर उपलब्ध आहेत आणि या TOU मध्ये संदर्भानुसार त्या समाविष्ट केल्या आहेत. निर्दिष्ट केलेल्या किंवा न केलेल्या सर्व किंमती या भारतीय रुपयात आहेत. किंमती, प्रॉडक्ट्स आणि सेवा या कंपनीच्या व्यवसाय भागीदारांकडून देऊ केल्या जातात आणि पैसाबझारच्या प्रत्येक व्यवसाय भागीदारांना लागू असलेल्या ब्रँड मार्गदर्शक तत्त्वांनुसार किंवा इतर अटी व शर्तींनुसार बदलू शकतात. काही प्रकरणांमध्ये कंपनी स्वतः सेवा आणि किंमती देऊ करते आणि अशा सेवांचा वापर व किंमती सुधारित करण्याचा अधिकार राखून ठेवते. तुम्ही पुढे असे वचन देता की व्यवहारास सुरुवात करून, ज्यांना लागू कायद्यांनुसार परवानगी असू शकते आणि कंपनीकडून स्वीकृत केलेल्या असू शकतात, अशा प्रदान सुविधा वापरून तुम्ही प्रॉडक्ट्स खरेदी करण्यासाठी किंवा सेवांचा लाभ घेण्यासाठी कंपनीच्या या व्यवसाय भागीदारांबरोबर कायदेशीररित्या बंधनकारक असलेला आणि अंमलबजावणीयोग्य करार करत आहात.

रजिस्ट्रेशन/सदस्यत्व किंवा ब्राउझिंगकरिता कंपनी कुठलेही शुल्क आकारत नाही. तथापि, कंपनी कुठल्याही वेळी रजिस्ट्रेशन/सदस्यत्व किंवा ब्राउझिंगकरिता कुठलेही शुल्क आकारण्याचा पूर्ण अधिकार राखून ठेवते. अशा सर्व

शुल्कांबाबत, जे कंपनी आकारू शकते, वापरकर्त्यांना सूचित केले जाईल आणि असे बदल वेबसाइटवर प्रदर्शित केल्याबरोबर ताबडतोब आपोआप लागू होतील. कंपनीने आकारलेली अशी सर्व शुल्के भारतीय रुपयांमध्ये असतील. तुमचा वेबसाइटचा सततचा वापर म्हणजे TOU च्या सुधारित अटींना स्वीकृती आहे असे मानले जाईल.

पैसे संकलित करणे, पैसे परत करणे आणि पैसे पाठविणे याकरिता आणि तुम्ही, पैसाबझार आणि त्यांचे व्यवसाय भागीदार, यापैकी जे असेल ते, यांच्यामधील प्रदान सुविधाजनक करण्यासाठी, ज्यांना भारतीय रीझर्व बँकेने अधिकृत केले आहे असे प्रदान सेवा देणारे तृतीय पक्ष सेवा प्रदाते आणि वित्तीय संस्था यांचेबरोबर कंपनी करार करू शकते. कंपनी तुम्ही केलेल्या प्रदानांचे पैसे पाठविण्यास सुरुवात करेल आणि व्यवहार पूर्ण झाल्याची तारीख ही तुम्हाला प्रॉडक्टस दिल्यानंतरची किंवा तुम्हाला सेवा पुरविल्यानंतरची आणि असा अन्य अतिरिक्त कालावधी, जो वेबसाइट आणि त्यांचे व्यवसाय भागीदार यांच्यामध्ये मान्य केल्यानुसार असू शकतो, यापैकी जी असेल त्याप्रमाणे, असेल.

वेबसाइटवर उपलब्ध असलेल्या प्रदानाच्या कुठल्याही पद्धतीचा/पद्धतींचा लाभ घेताना, खालील कारणांमुळे तुम्हाला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे होणारी कुठलीही हानी किंवा नुकसानीच्या संदर्भात कंपनी जबाबदार राहणार नाही किंवा कुठलेही उत्तरदायित्व स्विकारणार नाहीः

1. कुठल्याही व्यवहारा/व्यवहारांकरिता अधिकृतता नसणे किंवा
2. व्यवहारामधून निर्माण होणाऱ्या प्रदानाच्या कुठल्याही समस्या, किंवा
3. तुम्ही वापर करत असलेल्या प्रदानाच्या पद्धतींची अवैधता (क्रेडिट/डेबिट कार्डबाबत फसवणूक इ.),
4. कुठल्याही इतर कारणा/कारणांकरिता व्यवहारास नकार

येथे असे जरी असले तरी, तुमच्या/तुमच्या व्यवहाराच्या विश्वासार्हतेबाबत वेबसाइट समाधानी नसल्यास ती सुरक्षितता किंवा इतर कारणांकरिता अतिरिक्त पडताळणी करण्याचा अधिकार राखून ठेवते.
वेबसाइटने दिलेल्या प्रदान सुविधांचा वापर केल्याने, वेबसाइटवर सूचीबद्ध केलेली प्रॉडक्ट्स किंवा सेवांच्या संदर्भात प्रॉडक्टचे वितरण न होणे, प्रॉडक्ट न मिळणे, प्रदान न होणे, नुकसान, प्रतिनिधित्वांचा आणि हमींचा भंग, विक्री-पश्चात सेवा किंवा हमीसेवांची तरतूद न होणे किंवा फसवणूक याकरिता वेबसाइटला उत्तरदायी किंवा जबाबदार धरणार नाही. व्यवहारावर प्रक्रिया न झाल्यामुळे होणारे कुठलेही नुकसान, शुल्क किंवा दाव्यांकरिता वेबसाइट जबाबदार राहणार नाही.

वेबसाइटवरून किंवा वेबसाइटच्या माध्यमातून कुठलीही सेवा किंवा प्रॉडक्ट खरेदी करण्याकरिता क्रेडिट/डेबिट अशा प्रकारच्या माहितीसारखी अचूक माहिती देण्यासाठी तुम्ही सहमती देता. तुम्ही पुढे अशी हमी देता की, कायदेशीररित्या तुमच्या मालकीच्या नसलेल्या प्रदान तपशिलांचा किंवा साधनाचा तुम्ही वापर करणार नाही. या TOU शिवाय, बँक किंवा इतर वित्तीय संस्थेच्या अटी आणि शर्तीदेखील प्रत्येक वापरकर्त्याला लागू असतील. अशा बँकेकडून किंवा वित्तीय संस्थेकडून प्रदान नाकारले गेल्यास त्यामुळे निर्माण होणारे कुठलेही उत्तरदायित्व वेबसाइट नाकारते.

पैसाबझार त्यांच्या एकमात्र विवेकाधिकाराचा वापर करून व्यवहाराच्या संख्येवर मर्यादा घालू शकतात, ज्याचा वापर एखादी वित्तीय साधने असलेली व्यक्ती प्रॉडक्ट्स किंवा सेवांचे प्रदान करण्यासाठी करू शकते. याशिवाय, अशा मर्यादा ओलांडलेल्या व्यवहारांवर आणि तुम्ही केलेल्या ज्या व्यवहारांमध्ये शंकास्पद शुल्क व रकमेचा खर्च झाला आहे अशा व्यवहारांवर प्रक्रिया करण्यास नकार देण्याचा अधिकार वेबसाइट राखून ठेवते.

पैसाबझार हे केवळ एक सहाय्यक आहेत जे तुम्हाला स्वयंचलित ऑनलाइन इलेक्ट्रॉनिक प्रदानाच्या माध्यमांद्वारे (एकतर ते स्वतः किंवा प्रदानांसाठी वित्तीय सेवा पुरविणाऱ्या त्यांच्या सेवा प्रदात्यांद्वारे) कॅश ऑन डीलिव्हरी, वापरकर्त्यांनी विद्यमान बँक सुविधा आणि क्रेडिट कार्डद्वारे प्रदाने करण्याची सुविधा पुरविणारे सेवा प्रदाते यांचा वापर करून वेबसाइटवरून खरेदी केलेल्या प्रॉडक्ट्सच्या प्रदानांसाठी पैसे संकलित करण्याची आणि पाठविण्याची सुविधा प्रदान करतात.

तुम्हाला प्रॉडक्ट्स किंवा सेवा वितरित न झाल्यास किंवा वितरित होण्यास विलंब झाल्यास तसेच अशा विलंबामुळे तुम्हाला कुठलीही हानी किंवा नुकसान झाल्यास पैसाबझार त्यासाठी जबाबदार राहणार नाही आणि अशा बाबतीत त्यांचे काहीही उत्तरदायित्व असणार नाही. भारताच्या राष्ट्रीय सीमांच्या बाहेर प्रॉडक्ट्स/सेवा वितरित केल्या जाणार नाहीत.

## 11. उत्तरदायित्वाची मर्यादा

-

तुम्ही स्पष्टपणे समजता आणि सहमती देता की, कुठल्याही प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष, प्रासंगिक, विशेष, एखाद्या गोष्टीच्या परिणामस्वरूप किंवा नुकसानभरपाई देण्यामुळे होणाऱ्या हानीबरोबरच नफा, संधी, गुडविल, वापर, डेटा किंवा इतर अमूर्त नुकसान यांसहित पण यापुरतेच मर्यादित नसलेल्या नुकसानाबरोबरच जरी कंपनीला पुढील कारणांमुळे होणाऱ्या संभाव्य नुकसानाबाबत सूचित केले गेले असलेः (1) कुठलाही अयशस्वी व्यवहार किंवा विलंब (मर्यादेशिवाय वेबसाइटच्या कुठल्याही घटकाचा वापर किंवा वापर करण्याच्या अक्षमतेसह), किंवा (2) वेबसाइटचा किंवा सामग्रीचा कुठलाही वापर, किंवा (3) आमच्याकडून किंवा आमच्या कुठल्याही प्रदात्याकडून झालेले किंवा न झालेले कार्य, जरी अशा पक्षांना किंवा कुठल्याही इतर पक्षाला नुकसान होण्याच्या संभाव्यतेबाबत आम्हाला सूचित करण्यात आलेले असले तरीही, किंवा (4) तुम्ही वेबसाइटवर प्रवेश केल्यामुळे किंवा वेबसाइटवरून कुठलीही सामग्री डाऊनलोड केल्यामुळे तुमच्या संगणकाला व्हायरसमुळे झालेले नुकसान किंवा अन्य मालमत्तेला झालेले नुकसान याकरिता कंपनी (यामध्ये तिच्या सहयोगी व संलग्नित कंपन्या, संचालक, अधिकारी, कर्मचारी, प्रतिनिधी आणि प्रदाते यांचा समावेश होतो) उत्तरदायी असणार नाही.

असे जरी असले तरी, वर वर्णन केलेल्या कुठल्याही घटनांमुळे किंवा त्यांच्याशी संबंधित कुठल्याही प्रकाराने, कुठल्याही सिद्ध झालेल्या आणि प्रत्यक्ष नुकसानीकरिता किंवा हानीकरिता कंपनी जबाबदार असल्याचे आढळल्यास, तुम्ही सहमत आहात की, तुम्ही कंपनीला या वेबसाइटवरील व्यवहार/व्यवहारांच्या/सेवांच्या संबंधात सेवेकरिता/व्यवहाराकरिता दिलेल्या कुठल्याही एकंदर शुल्कापुरते, लागू असल्यास, कंपनीचे उत्तरदायित्व मर्यादित असेल.

तुम्हाला कंपनीच्या वेबसाइट्सद्वारे प्रदान केल्या जातील अशा तृतीय पक्षाच्या वेबसाइट्सवर कंपनीचे कुठलेही नियंत्रण नाही. तुम्ही स्वीकृती आणि सहमती देता की, कुठल्याही तृतीय पक्षाच्या सेवा प्रदात्याकडून ऑफर केलेल्या किंवा दिलेल्या सेवांचा तुम्ही वापर करण्याकरिता कंपनी कुठल्याही परिस्थितीत जबाबदार राहणार नाही.

## 12. नुकसानभरपाई

-

तुम्ही सहमत आहात की, कुठलेही दावे, कारवाईची कारणे, मागण्या, वसुली, नुकसान, हानी, आर्थिक दंड, भुर्दंड किंवा वकिलाची फी किंवा तुम्ही या TOUचा केलेला भंग, तुम्ही केलेल्या कुठल्याही कायद्याचे अथवा तृतीय पक्षाच्या अधिकारांचे उल्लंघन किंवा तुम्ही वेबसाइटचा केलेला वापर याच्याशी संबंधित किंवा यामुळे उद्भवणारे खर्च यांसहित कुठल्याही स्वरुपाचे इतर मूल्य किंवा खर्च याची तुम्ही कंपनीला (आणि तिच्या संलग्नित कंपन्या, अधिकारी, संचालक, एजंट्स आणि कर्मचारी) भरपाई कराल आणि याकरिता कंपनीला जबाबदार धरणार नाही.

तुम्ही कुठल्याही आणि सर्व प्रकारच्या जबाबदाऱ्या, दावे, मागण्या, नुकसान, प्रतिपादने, कायदेशीर कारवाई, मूल्य आणि खर्च (कोर्टाचा खर्च आणि वकिलाच्या फीसहित) ("नुकसान") यापासून कंपनी, तिचे अधिकारी, संचालक, कर्मचारी, एजंट, परवानाधारक, सहयोगी, उत्तराधिकारी आणि वारस (येथून पुढे "रीलीज") यांना संयुक्तरित्या आणि वैयक्तिकरित्या, कायदा किंवा इक्विटीमध्ये, जे काही आहे, मग ते ज्ञात असो वा अज्ञात, जे सेवांच्या संदर्भात रीलीजविरुद्ध तुमच्याकडे आधी होते, आता आहे किंवा भविष्यात असू शकते, त्यासंदर्भातील उत्तरदायित्वातून अपरिवर्तनीय रूपाने, विनाशर्त आणि पूर्णपणे मुक्त करता, माफ करता, आणि नेहेमीकरिता रीलीज करता आणि त्या संदर्भात तुम्ही कायदेशीर कारवाई करणार नाही किंवा अन्यथा कुठलीही मागणी किंवा दावा दाखल करणार नाही. या अधिकारातून आणि त्याच्यासंबंधात तृतीय पक्षांनी कंपनीविरुद्ध केलेल्या दाव्यांमुळे निर्माण होणाऱ्या कुठल्याही आणि सर्व प्रकारच्या नुकसानाची भरपाई करण्यास आणि त्यापासून रीलीजचा बचाव करण्यास आणि त्यांना उत्तरदायी न समजण्यास सहमती देता.

**13. अतिरिक्त अटी आणि शर्ती**

-

कंपनी, तिला उचित आणि योग्य वाटेल अशा कोणत्याही वेळेस, वेबसाइट, वेबसाइटशी संबंधित धोरणे आणि करार, या TOU आणि गोपनियता धोरणात बदल करण्याचा, तसेच कायदा किंवा नियमनातील बदलांचे पालन करणे, चुका, नजरचुका, त्रुटी किंवा संदिग्धता सुधारणे, सेवा आणि सहाय्यक सेवांच्या प्रक्रियेचे अनुक्रमिक टप्पे, व्याप्ती आणि स्वरूप, कंपनीची पुनर्रचना, बाजारपेठेसंबंधीची कार्यप्रणाली किंवा ग्राहकांच्या आवश्यकता यामधील बदलांबाबत विचार करणे यासहित परंतु यापुरतेच मर्यादित नसलेले बदल करण्याचा अधिकार राखून ठेवते. कुठलाही बदल केल्यास, कंपनी वेबसाइटवर किंवा अन्य माध्यमांवर अद्ययावत केलेल्या अटींबाबत सूचित करेल. सेवांचा आणि सहाय्यक सेवांचा तुमचा निरंतर वापर, या बदलांना स्वीकृती देतो आणि सुधारित केल्यानुसार अटींनी बांधिल असा एक करार स्थापित करतो. तुम्ही जर या बदलांशी सहमत नसाल तर कृपया तुम्ही सेवा आणि सहाय्यक सेवांचा तुमचा वापर बंद करू शकता.

कंपनी, पर्याप्त कालावधीची सूचना देऊन, सर्वोत्तम प्रयत्नांच्या आधारे, जोपर्यंत हे केवळ सेवा आणि/किंवा वेबसाइटची काही वैशिष्ट्ये/सामग्री बदलण्यासाठी किंवा सेवांची सुरक्षितता आणि अखंडता राखण्यासाठी नसेल, तोपर्यंत सहाय्यक सेवांसहित सेवा, तात्पुरत्या किंवा कायमस्वरूपी बंद करण्याचा किंवा स्थगित करण्याचा अधिकार राखून ठेवते. तुम्ही सहमती देता की, कंपनी सेवांच्या कुठल्याही बदलांकरिता किंवा त्या बंद करण्याकरिता कुठल्याही प्रकारे तुम्हाला उत्तरदायी नसेल.

तुम्ही सेवा आणि सहाय्यक सेवांचा वापर बेकायदेशीर हेतुंकरिता न करण्यासाठी किंवा बेकायदेशीर, त्रास देणारी, अब्रूनुकसानीकारक (चुकीची आणि इतरांना हानी पोहोचवणारी), दुसऱ्याच्या गोपनियतेवर आक्रमण करणारी,

अपमानकारक, धमकावणारी किंवा बीभत्स किंवा जी इतरांच्या अधिकारांचे उल्लंघन करते अशा सामग्रीचे प्रसारण न करण्यासाठी सहमत आहात.

कंपनी वेळोवेळी तिच्या वेबसाइटचा आणि/किंवा सेवा/सहाय्यक सेवांचा प्रचार करण्याच्या हेतुने काही ऑफर्सची घोषणा करू शकते (प्रचारात्मक ऑफर/र्स). प्रचारात्मक ऑफर/र्स नेहमी या TOU द्वारे तसेच काही अतिरिक्त अटी आणि शर्ती निर्धारित केल्या असल्यास, त्याद्वारे शासित केली जाईल/केल्या जातील. सदर अतिरिक्त अटी आणि शर्ती, जर निर्धारित असतील, केवळ संबंधित प्रचारात्मक ऑफर्ससाठीच विशिष्ट असतील आणि त्या ज्या मर्यादेपर्यंत या अटींच्या परस्परविरोधी असू शकतात त्या मर्यादेपर्यंत सदर अटी आणि शर्ती या TOU पेक्षा प्रभावी राहतील. कंपनी तिच्या एकमात्र विवेकाधिकारात, प्रचारात्मक ऑफर/र्स आणि त्यांना शासित करणाऱ्या अटी काढून घ्यायचा, बंद करण्याचा, सुधारित करण्याचा, विस्तारित करण्याचा आणि तात्पुरत्या स्थगित करण्याचा अधिकार राखून ठेवते.

**14. सर्वसाधारण**

-

या अटींपैकी कोणत्याही अटी अवैध, निरर्थक किंवा कुठल्याही कारणास्तव लागू न करण्यायोग्य मानल्या गेल्यास, सर्व पक्ष सहमती देतात की, तरतुदीमध्ये दर्शविल्याप्रमाणे पक्षांच्या उद्देशांना कार्यान्वित करण्याचा प्रयत्न न्यायालयाने करावा आणि लागू न करता येणारी अट वगळण्यायोग्य मानली जाईल आणि उर्वरित कुठल्याही अटीच्या वैधतेवर आणि तिच्या लागू होण्याच्या क्षमतेवर परिणाम करणार नाही. शीर्षके केवळ संदर्भाच्या उद्देशाकरिता आहेत आणि त्यामुळे अशा विभागाची व्याप्ती किंवा विस्तार मर्यादित होत नाही. या TOU आणि तुम्ही व कंपनी यांच्यातील संबंध भारतीय कायद्यांद्वारे शासित केले जातील. या करारामुळे निर्माण होणाऱ्या किंवा या कराराशी संबंधित कुठल्याही विवादाचे, विरोधाभासाचे किंवा दाव्याचे, त्यामुळे होणाऱ्या उल्लंघन किंवा निलंबनासहित, निराकरण, मध्यस्थ आणि सामंजस्य कायदा, 1996 च्या तरतुदी किंवा त्यामध्ये झालेल्या सुधारणा यांना अनुसरून, कंपनी आणि तुमच्या परस्पर सहमतीने नियुक्त केलेल्या एकमात्र मध्यस्थाकडून केले जाईल. एकमात्र मध्यस्थ असण्याच्या बाबतीत आमची सहमती न होऊ शकल्यास आम्ही तीन मध्यस्थांचे पॅनेल नियुक्त करण्यास सहमती देतो, ज्यापैकी एकाची नियुक्ती आपल्यापैकी प्रत्येकजण करतील आणि हे दोन मध्यस्थ तिसऱ्या मध्यस्थाची नियुक्ती करतील. लवादाचे कार्य पार पाडण्याचे ठिकाण गुरुग्राम राहील. लवादाची प्रक्रिया इंग्रजी भाषेत होईल आणि लवादाचा कुठलाही/कुठलेही निर्णय इंग्रजी भाषेत दिला जाईल/दिले जातील. या अटींच्या सर्व निर्बंधांना समर्थन नसलेल्या देशांमध्ये किंवा अधिकारक्षेत्रांमध्ये, वेबसाइट तिच्या सेवांपैकी कुठल्याही सेवांचा वापर तुम्हाला करू देण्यास विशेषकरून प्रतिबंधित करते. ही वेबसाइट विशेषकरून भारतातील वापरकर्त्यांकरिता आहे. न्यायिक किंवा अर्ध-न्यायिक अशा कुठल्याही विवादाच्या बाबतीत, असा विवाद भारतीय कायद्यांच्या अधीन असेल आणि गुरुग्राममधील विशेष अधिकार असलेल्या न्यायालयांमध्ये चालविला जाईल. तुमच्याकडून किंवा इतरांकडून झालेल्या उल्लंघनाच्या संदर्भात कारवाई करण्यात कंपनी अयशस्वी ठरल्याने, त्यानंतर झालेल्या किंवा तशाच प्रकारच्या उल्लंघनाकरिता कारवाई करण्याचा आपला अधिकार कंपनी गमावत नाही. या TOU, तुम्ही आणि कंपनीमधील संपूर्ण करार स्थापित करतात आणि वेबसाइटच्या संदर्भात, तुम्ही आणि कंपनी यांच्यातील आधीच्या कुठल्याही करारांची जागा घेत, वेबसाइटचा वापर शासित करतात.

पैसाबझार.कॉम
प्लॉट क्र. 135,
सेक्टर-44, गुरगाव-122001
हरियाणा

टेलीफोन - 0124 - 4562900
फॅक्स - 0124 - 4562902
ईमेल: **care@paisabazaar.com.**

आमच्या गोपनियता धोरणाबद्दल तुमचे काही प्रश्न, समस्या किंवा सूचना असल्यास, आमच्या **Contact Us** या पृष्ठावरील किंवा **care@paisabazaar.com** वर दिलेली संपर्क माहिती वापरून आमच्याशी संपर्क साधू शकता.

शेवटचे अद्ययावत केले - **06/11/2019**